क्र. उसं/मातं/मातं उद्यान/२००७/बी-८८२८
उद्योग संचालनालय, नविन प्रशासन भवन,
मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक :- २३/०५/२००७.**

प्रति,

१) सर्व विभागीय उद्योग सह संचालक.

२) सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.

३) तांत्रिक सल्लागार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.

४) खाजगी/सार्वजनिक माहिती तंत्रज्ञान उद्यान (सर्व).

**विषय :- माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण घटकांना मुद्रांक शुल्क सवलत माफी.**

**संदर्भ :-** १) माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण, २००३.
२) मुख्यालयाचे परिपत्रक क्र. ६/९९, दिनांक ०७/०५/१९९९.
३) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा दिनांक ०५/०५/२००१ व दिनांक २९/१२/२००३ चा आदेश
४) शक्तिप्रदान समिती दिनांक ११/०४/२००७ च्या बैठकीचे इतिवृत्त.
५) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई यांची टिप्पणी, दिनांक १५/०५/२००७.

राज्यातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्राच्या उन्नतीसाठी माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण,२००३ अंतर्गत माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा उद्योग घटकांना विविध आर्थिक व इतर अनुषंगिक सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत. हया सर्व सवलती उद्योग संचालनालयाने प्राधिकृत केलेल्या संस्थाकडे नोंदणी झालेल्या माहिती तंत्रज्ञान उद्यानातील सर्व माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा उद्योग घटकांनाही लागू आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या दिनांक ०५/०५/२००१ च्या शासन निर्णयानुसार माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा उद्योग घटकाना अनुज्ञेय असलेली मुद्रांक शुल्क माफीची सवलत फक्त नविन घटकांना लागू करण्यात आली आहे. उपरोक्त योजना दिनांक २९/१२/२००३ च्या महसूल व वन विभागाच्या आदेशानुसार दिनांक ३१/५/२००८ पर्यंत आहे.

शक्ती प्रदान समितीच्या दिनांक ११/०४/२००७ च्या बैठकीत पुढील प्रमाणे निर्णय झाला आहे.. सद्य:स्थितीत जर एक माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा उद्योग घटक जर वेगवेगळया ठिकाणी स्थापन होत असेल तर अशा प्रत्येक ठिकाणी स्थापन होणाऱ्या घटकास मुळ घटकाचा विस्तारीत घटक म्हणून संबोधिले जाते. मात्र आता अशा प्रकारे स्थापन होणाऱ्या घटकांना नविन घटक समजले जाईल. अशा घटकांस मुद्रांक शुल्क माफीची सवलत लागू राहील.

शक्ती प्रदान समितीच्या उपरोक्त निर्णयानुसार कार्यवाहीसाठी कळविण्यात येत आहे.

**उद्योग सह संचालक** (मातं)
**विकास आयुक्त (उद्योग) यांचे करिता**

http://10.1.52.52/mail/edpbrind.nsf/0/952639501A24A01C652572E400347D28/$File/Circular_IT & ITES_17.05.2007.doc?OpenElement